महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७१ वा | दिनांक : ०९/०४/२०२५ | वार : बुधवार


## सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात विशेष तपास पथक (SIT) नेमा - प्रकाश आंबेडकर



**छत्रपती संभाजीनगर :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मंगळवारी परभणीच्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणाची एसआयटी अर्थात विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली. प्रस्तुत प्रकरणात राज्य सरकार आरोपी आहे. मग ते या प्रकरणाचा तपास कसा काय करू शकते? असा कळीचा प्रश्न त्यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात उपस्थित केला आहे.

परभणी पोलिसांच्या मारहाणीत न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मातोश्री विजयाबाई सूर्यवंशी यांनी याविरोदता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकारविरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली. सूर्यवंशी कुटुंबीयांतर्फे स्वतः प्रकाश आंबेडकर यांनी युक्तिवाद केला. त्यात त्यांनी या प्रकरणाची न्यायालयाच्या निगराणीखाली एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली.

सुनावणीनंतर पत्रकारांशी वार्तालाप करताना आंबेडकर म्हणाले की, शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकार विरोधात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर आज औरंगाबाद न्यायालयात सुनावणी होती. मी या प्रकरणी याचिकाकर्त्यांकडून न्यायालयात बाजू मांडली.

न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्यावर मॅजिस्ट्रेटने चौकशी केल्यानंतर पुढे काय करावे? याविषयी कायदा अपूर्ण आहे. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणात नियमावली तयार करावी, अशी मागणी न्यायालयाकडे केली. विशेषतः या प्रकरणात आम्ही SIT नेमण्याची मागणीही केली आहे. ही SIT कोर्टाने नेमावी आणि कोर्टाच्या अधिपत्याखाली ती चालावी.

सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात आरोपी हे राज्य सरकार आहे. त्यामुळे प्रकरणात आरोपी असलेले राज्य सरकार त्याच प्रकरणाचा तपास कसा करू शकतो?, असा युक्तिवाद ही कोर्टात केला. बदलापूर प्रकरण आणि परभणी प्रकरण एकसारखेच आहे. बदलापूर प्रकरणी तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली सुरू आहे, याही प्रकरणात तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावा अशी मागणी आम्ही केली, असे आंबेडकर म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी सीआयडी अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागालाही आरोपी करण्याचे संकेत दिले. मध्यंतरी CID ने सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेत चौकशी केली होती. पुढच्या सुनावणीच्यावेळी आम्ही CID ला आरोपी करू. हायकोर्टाकडून राज्य सरकारसह संबंधित यंत्रणांना नोटीस जारी करण्यात आली आहे आणि 29 एप्रिल पूर्वी आपले म्हणणे सादर करायला सांगितले आहे. या प्रकरणी 29 एप्रिलला पुढील सुनावणी होईल, असे ते म्हणाले.

## 'एक्सक्युज मी' म्हटल्यावरून वाद:मराठीत बोला म्हणत दोन महिलांना बेदम मारहाण



**मुंबई :** मराठी न बोलल्याने दोन महिलांना बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. मुंबईला लागून असलेल्या डोंबिवलीत ही घटना घडली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, ती तिच्या सहकाऱ्यासोबत स्कूटीवर येत होती. तिने रस्त्यावर उभ्या असलेल्या लोकांना बाजूला होण्यास सांगितले, त्यानंतर त्यांच्यापैकी एकाने मागे वळून मराठीत बोलण्यास सांगितले आणि स्कूटी चालवणाऱ्या महिलेवर हल्ला केला. धक्कादायक बाब म्हणजे याप्रकरणी पोलिसांनी केवळ एनसी दाखल केली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, डोंबिवली पश्चिमेतील जुनी डोंबिवली येथील गणेश श्रद्धा बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या पूनम गुप्ता काल रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मैत्रिणीसोबत स्कूटीवरून घराकडे निघाल्या होत्या. तेव्हा बिल्डिंगच्या बाहेर रस्त्यावर काही लोक उभे होते. त्यांना बाजूला होण्यासाठी "Excuse me" असे इंग्रजीत म्हटले. पूनम गुप्ता यांनी एक्सक्यूज मी म्हणताच, एका तरुणाने मागे फिरून मराठी बोला असे म्हणत त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली.

त्या तरुणाने दोन्ही महिलांकडे मराठीतून बोलण्याचा आग्रह धरला. त्यावेळी दुचाकीवर एक महिला दुचाकी चालवित होती. दुसरी महिला तिच्या पाठीमागे दुचाकीवर एक नऊ महिन्याचे बाळ घेऊन बसली होती. मराठीतून बोलत नाही म्हटल्यावर तरुणाने दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या महिलेचा हात पिरगळून, तिला मराठी कशी बोलत नाहीस, असा प्रश्न केला.

महिलांनी मराठी बोलण्यास नकार दिल्यानंतर रितेश बाबासाहेब ढबाले त्यांची पत्नी आणि बाबासाहेब गोविंद ढबाले व त्यांच्या काही साथीदारांनी "इंग्रजी नाही, तर मराठीत बोला" असे म्हणत पूनम आणि त्यांच्या मैत्रिणीला बेदम मारहाण केली. हा प्रकार सुरू असतानाच पूनम यांचे पती आणि दुसरी मैत्रीण तेथे मदतीला आले. मात्र त्यांनाही मारहाण करण्यात आली. या मारहाणीदरम्यान, एका व्यक्तीच्या डोक्याला इजा झाली. या मारहाणीचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या मारहाणीत एका महिलेच्या कडेवर असणाऱ्या बाळाची आबाळ झाली. हा प्रकार सोसायटीच्या प्रवेशद्वारात सुरू होता.

एक्सक्यूज मी हा नेहमीच्या वापरातील शब्द आहे. त्यामुळे तो बोलला म्हणजे मराठी भाषेचा अपमान होत नाही. असे असताना किरकोळ कारण पुढे करून आम्हा दोघींना सात जणांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी आम्ही विष्णुनगर पोलिस ठाण्यात सात जणांविरोधात तक्रार केली आहे. पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे, असे तक्रारदार महिलेने सांगितले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ एप्रिल २०२५


## कन्नड तालुक्यातील १३८ ग्रामपंचायत सरपंच पदांचे आरक्षण जाहीर




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील १३८ ग्रामपंचायत सरपंच पदांचे आरक्षण दि. ०८ एप्रिल रोजी जाहिर करण्यात आले.ग्रामपंचायत निहाय सरपंच पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे.अनुसूचित जाती:- महिला - मक्रणपूर, खामगाव, मुंडवाडी, लामणगाव, अंधानेर, निंभोरा, सर्वसाधारण- चिंचोली लीं., वाकद, ताड पिंपळगाव, सासेगाव, हिवरखेडा गौ, रुईखेडा,अनुसूचित जमाती:- महिला- चिंचखेडा बु., निपाणी, रिठ्ठी, नागपूर, वडाळी, सर्वसाधारण- देवळाणा, जवळी बु.व खु., गणेशपूर, टापरगाव,इतर मागासवर्ग:- महिला- कुंजखेडा, ब्राम्हणी, बनशेंद्रा, आठेगाव, टाकळी बु., जवखेडा बु., दहिगाव, नेवपूर जा., नादरपूर, नीमडोंगरी, माटेगाव, बोरसर खु., पळशी बु., आलापूर, लंगडातांडा, हरसवाडी, बहिरगाव, उंबरखेडतांडा, रामपूरवाडी, सर्वसाधारण- पळशी खु., जळगावघाट, सारोळा, तेलवाडी, नावडी, नाचणवेल, आडगाव जे, वीटखेडा, वासडी, सोनवाडी, घुसूर, देभेगाव, डोंगरगाव, भिलदरी पि, टाकळी ल, वडोद, जैतखेडा, पळसखेडा, सायगव्हाण,सर्वसाधारण:- महिला- चापानेर, चिकलठाण, नागद, बोरसर बु, रेल, अंबाला, चिंचखेडा बु, हस्ता, उपळा, हसनखेडा, दिगाव खेडी, जेहूर, भांबरवाडी, वाकी ज, गौरपीप्री, जैतापूर, बरकतपूर, आमदाबाद, वडनेर, गुदमा, शेलगाव, अंबा, घाटशेंद्रा, नेवपूर खा, चिमणापूर, सावरगाव, तपोवन, खेडा, रोहीला खु, भारंबा, डोणगाव, मोहरा, बेलखेडा, मुंडवाडी तांडा, तळनेर, उंबरखेडा, हतनूर, सितानाईकतांडा, रामनगर, जामडी जा, सर्वसाधारण- आडगाव पि, भोकनगाव, लोहगाव, शिरोडी, माळेगाव ठो, जवखेडा खु, दाभाडी, नागद तांडा, अंबा तांडा, जैतखेडा तांडा, औराळा, कानडगाव क, देवपूडी, पिंपरखेडा, चांभारवाडी, देवगाव रंगारी, गव्हाळी, धामणी खु, औराळी, वडगाव जा, मेहगाव, खातखेडा, जामडीघाट, हिवरखेडा नां, देवपूळ, गराडा, कोळवाडी, विटा, शिवराई, तांदुळवाडी, भारंबा तांडा, कोळंबी मा, बिबखेडा, सिरसगाव, टाकळी अंतूर, सातकुंड, कुंजखेडा जा, पिशोर, कळंकी.

## दौलताबादच्या देवगिरी किल्ल्याला भीषण आग...



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते) :** दौलताबाद येथील ऐतिहासिक देवगिरी किल्ला दि. ८ मंगळवार रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान आगीच्या विळख्यात सापडला या भीषण आगीमुळे किल्ल्याच्या आजूबाजूच्या परिसरातील वळलेले गवत, झाडं झूडपं जळून खाक झाली असून वन्यजीवसृष्टी आणि ऐतिहासिक वारसा धोक्यात आला आहे. ही आग 'काला कोट' भागापासून सुरू झाल्याचे समजते वाऱ्याच्या झोताने क्षणार्धात बालेकिल्ल्याला वेढून घेतलं क्षणार्धात किल्ला धूर आणि आगीच्या विळख्यात धूसर झाला. जुन्या बारादरीवरील लाकडी सज्जे व तुळे यांच्यावर देखील भस्मसात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे आग कशी आटोक्यात आणावी हा अग्निशमन विभागासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. प्राणी सैरावैरा धावत सुटले...! आगीने उग्र रूप धारण करताच सुकलेल्या गवतामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आग इतकी पसरली की माकडं,मोर व इतर पक्षी आजूबाजूच्या शेताकडे पळताना दिसले. अनेक लहान प्राणी आणि जीवजंतू होरपळून गेले या दृश्यांनी उपस्थितांचे काळीज हादरले. धुराचे लोट , उष्ण झळांनी प्राणी, पक्षी सैरावैरा पळाले.दरवर्षी उन्हाळा आला, की देवगिरी किल्ल्यावर आग लागण्याच्या घटना घडतात या घटनेकडील दुर्लक्षामुळे इतिहासाचा अमूल्य ठेवा धोक्यात आला आहे.पर्यटक प्रेमी,अभ्यासकांच्या मते या वारंवार लागणाऱ्या आगीमुळे किल्ल्यावरील पुरातन वास्तूंचे नुकसान होत आहे. शासनाने वेळीच पावले उचलली नाही तर हा ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.प्रशासनाने किल्ल्याच्या संरक्षणासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथे आर/ओ फिल्टर व वॉटर चिलरचा शुभारंभ



**सिंदखेडराजा (महेश मुंढे) :** पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथे आज अभ्यागत नागरिकांसाठी आर/ओ फिल्टर व वॉटर चिलरच्या पिण्याच्या पाण्याच्या सुविधेचा शुभारंभ उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्रीमती मनिषा कदम मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमप्रसंगी पोलीस निरीक्षक ब्रह्मदेव शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार जाधव, पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप, प्रदीप वायाळ तसेच पोलीस अंमलदार संजय डोंगरदिवे, अनिल खर्डे, संदीप डोंगरे, विठोबा आंधळे, दिपक जयभाये, श्रावण डोंगरे, ज्ञानेश्वर दहातोंडे, जाकीर पठाण, विकास राऊत, शंकर तांबेकर, गजानन बनसोडे, संदीप आघाव, मदन मुळे, महिला अंमलदार वर्षा शिंदे व शिळा कोळे तसेच सर्व गृहरक्षक व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी अथवा इतर कारणांसाठी येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने ठाणेदार ब्रह्मदेव शेळके यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. या सामाजिक उपक्रमात पोलीस स्टेशनमधील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपली आर्थिक भागीदारी जपत आर/ओ फिल्टर व वॉटर चिलर बसवण्याचा खर्च उचलून हे कार्य पूर्णत्वास नेले.सार्वजनिक हितासाठी पोलीस दलाच्या वतीने उचलण्यात आलेल्या या पावलाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## कन्नड मध्ये रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** येथे स्वराज्य रक्षक संघा तर्फे आयोजित रामनवमी च्या निमित्त शोभायात्रा काढण्यात आली. या समिती चे अध्यक्ष विजय भाऊ चव्हाण होते. शोभायात्रा गिरणी ग्राऊंड ते राम मंदिर पर्यंत काढण्यात आली, भावी जिल्हा परिषद सदस्य विजय भाऊ चव्हाण, सं.अध्यक्ष नितीनजी राठोड, अमोलजी तागवाले, संजयजी पंडीत, दिपकजी डोळस उमेशजी राठोड,अनिलजी शिरसाट, प्रमोदजी ढोले, आदित्य पाटील, जयेश देशमुख, कृष्णाजी बडग, शेखरजी मांडे सर, योगीराज भाऊ, साबळे,कैलासजी जाधव, बंटीभाऊ इंगळे, विश्वजित केवट,निशांत चव्हाण, कुणाल चव्हाण, यश गोरे अदी ची उपस्थिती होती .विजय भाऊ चव्हाण (समिती अध्यक्ष)यांनी उपस्थित सर्व नागरिकांना रामनवमी निमित्त शुभेच्छा दिल्या. रामनामाचा होणारा गजर व पिशोर नाका येथे सार्वजनिक हनुमान चालिसा पठण करण्यात आले असून सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ एप्रिल २०२५


## कन्नड शहरात घाणीचे साम्राज्य, डासांचा वाढता प्रादुर्भाव




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहरांमध्ये शिवसेना (शिंदे गट) शहरातील शिवसैनिकांनी कन्नड शहरात वाढत असलेला डासांचा प्रादुर्भाव वर फवारणी करणे, कन्नड शहरातील तुडुंब भरलेल्या गटर नाल्या शहरातील घाणीचे साम्राज्य दूर करण्यासाठी आज कन्नड नगरपालिका चे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांना निवेदन दिले. याप्रसंगी तहसीलदार विद्याचरण कडवकर उपस्थित होते.या निवेदनात ५% टक्के रक्कम ही शहरातील दिव्यांगण नागरिकांसाठी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. कन्नड शहरात धूर फवारणी ताबड तोब करावी व शहरातील नागरिकांचे आरोग्याचे काळजी घ्यावी असे आव्हान यात करण्यात आले आहे. जनता ही नळ पट्टी, घरपट्टी, स्वच्छता कर व सर्व प्रकारचे कर भरून सुद्धा नागरिकांना नागरिक सुविधा भेटत नाही. यामुळे जनतेमध्ये नगरपालिका प्रशासन बद्दल प्रचंड रोष वाढत चाललेला आहे. नगरपालिका हद्दीतील जनतेला १० ते १२ दिवसानंतर पाणी येते व कमी दाबामुळे पाणी भरणे होत नाही. सध्याला उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पाण्याचे प्रचंड हाल चालू आहे कन्नड शहरात गल्लोगल्ली प्रचंड घाण आहे काही ठिकाणी गटर नाल्याचे पाणी रोड वरून वाहत आहे, घंटागाडी ही चार ते पाच दिवसाला एकदाच येते त्यामुळे गृहिणींना कचरा घरात साठवून ठेवणे अवघड झालेला आहे. प्रत्येक वेळेस सफाई कर्मचारी नाही हेच कारण पुढे करून जनतेची बोळवण केल्या जाते वसुली मात्र जोरात करतात व साफ सफाईकडे काना डोळा करतात.या निवेद ना वर माजी उपनगराध्यक्ष डॉ सदाशिव पाटील, माजी नगरसेवक संतोष पवार, कैलास जाधव, रत्नाकर पंडित, राम पवार, आदित्य गर्जे पाटील, प्रदीप बोडखे, ऋषिकेश चव्हाण, सलमान शेख, लक्ष्मीकांत सुरे, यासीन शेख, प्रकाश काचोळे, श्रीराम घुगे, दीपक दाभाडे, सिद्धार्थ निकाळजे, संदीप घोंगते, संदीप चव्हाण,चंद्रकांत लाडे या निवेदनावर इत्यादी शिवसैनिक सही आहे.

## जिद्द, प्रामाणिकपणा आणि कष्ट करण्याची तयारी असेल तरच यश मिळेल




**जालना :** पदवीचे उच्चशिक्षण घेत असताना तुम्ही प्रामाणिकपणाने अभ्यास केला, वर्गात बसलात, शिक्षकांच्या शिकवण्याकडे लक्ष दिले. त्याचबरोबर व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने अनेक गोष्टी तुम्ही शिकलात. मात्र यापुढे जीवनाची लढाई खऱ्या अर्थाने सुरू होणार आहे. आम्हाला खात्री आहे की तुम्ही कुठेही अपयशी ठरणार नाही. असा सूर बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील बी.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचे देताना निघाला. यावेळी प्राचार्य कविता प्राशर, प्रा. डॉ.कालिदास सूर्यवंशी, डॉ. कल्याण कुंभार, डॉ. उद्धव थोरवे, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. बळीराम कटारे, डॉ. रवींद्र भोरे, प्रा.शशिकांत चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांतर्फे प्रतिज्ञा साळवे, वैष्णवी सिरसाट, प्रसाद वाघमारे, सारिका भूतेकर, दिव्या भारोटे, रिया लोखंडे, ऋतुजा गुरव, यांनी विचार व्यक्त केले. महाविद्यालयाने आणि शिक्षकांनी दिलेले प्रेम आम्ही कधीही विसरू शकत नाही. येथील शिक्षकाने केलेले संस्कार हे अनमोल आहे. शिस्त आणि संस्काराचे प्रयोगशाळा हे महाविद्यालय आहे. ज्ञानार्जनाबरोबरच व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य या महाविद्यालयाने दिले आहे. येथील शिक्षकांनी आमच्या चांगल्या कामाची कौतुक केले तसेच गैरवर्तन केले असता शिस्तही लावली. आमच्यात आज जो आत्मविश्वास निर्माण झाला तो या महाविद्यालयातील शिक्षकांनी निर्माण केला असून भविष्यातील वाटचालीसाठी तो आम्हाला सतत प्रेरणा देत राहील असे उद्गार अनेक विद्यार्थ्यांनी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली मिल हिने तर आभार अमोल जायभाये यांनी मानले. प्रा.डॉ. व्यंकटेश कोरेबोईनवाड, प्रा.स्मिता निर्मल, प्रा.गणेश जाधव, प्रा. रामेश्वरी कमठम यांच्यासह बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.याच कार्यक्रमाला लागून विज्ञान शाखेच्या रसायनशास्त्र विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचाही निरोप समारंभ ठेवला होता. याप्रसंगी वर्गातील चैतन्य ईवरे, यश मेहेत्रे, राजकन्या दंडाईत, स्वामिनी देशमुख, पूजा क्षीरसागर, पूजा मात्रे, विना अकोलकर, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व बीएससी तृतीयचे विद्यार्थी, प्रा माधव हेबाडे, प्रा.भाग्यश्री पैठने उपस्थित होते. यावेळी प्रा.रवींद्र शिंपी, विभागप्रमुख प्रा.ओम चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## अंगारमाती



भट्टीत तावून सुलाखून निघावं
तसं आयुष्य...
नुसती धावपळ,
संघर्ष व यातनांचा प्रवास
एकेक वाट अडवाट तुडवट
कोस दरकोस करीत
वाट -चाल सुरू आहे.

ना कोणता लोभ ना कोणती अभिलाषा,
समोर होते फक्त एकच भागध्येय
आणिक संघर्षाचा निखारा...
सोबतीला सारे माणूसकीचे झरे
अनुभवायला होते

अनेक कोरडे उन्हाळे - पावसाळे
व्यवस्थेच्या चरखात आयुष्य
विरघळून गेले,
अजुनि चालतो वाट तरी
संघर्षाचे किनारे सोबतीला
म्हणूनच माती अंगार झाली...

**डॉ. शिवाजी हुसे**
**मो. ९४०४० ००३९८**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ एप्रिल २०२५


## शासकीय कर्करोग रुग्णालयात पेट स्कॅनची व्यवस्था करून ५० कोटीं निधी देऊन विविध योजनांचा लाभ द्या - डॉ. राजेंद्र दाते पाटील यांची मागणी



**मुंबई (प्रतिनीधी)-** शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर येथे पेट स्कॅनची व्यवस्था करून ती आंमलात येई पर्यंत शासनाच्या विविध योजनेतून ही सेवा गोर गरीब रुग्णांना मोफत उपलब्ध करणे व पेट स्कॅन कार्यान्वित करण्या साठी किमान ५० कोटीं निधीची उपलब्धता होण्याचे आदेश द्यावेत अशी महत्वाची मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री यांचें कडे केली असता जन आरोग्य विभागाचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कडे योग्य ते आदेश देउन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन पाठवले आहे.

या बाबत सविस्तर निवेदन असे आहे की, पेट स्कॅन साठी गोरगरीब रुग्ण,शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे येतात वास्तविक पहाता जवळ पास संपुर्ण महाराष्ट्रात या अत्यावश्यक सेवेचा अभाव असल्यामुळें रुग्ण मृत्युशी झुंज देत आहेत.शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णाच्या पेट स्कॅन इलाज करावयाचे असेल तर या रुग्णालयात ही सुविधा नाही, हे पेट स्कॅन खाजगी रुग्णालयातुन करून आणा असे सर्रास रुग्णालया तुन सांगीतले जात असल्यामुळे गोर गरीब रुग्ण हवालदिल झाले असल्याची महत्वाची बाब पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निदर्शनास आणून दिली असता वरील प्रमाणे आदेश झाले आहेत.

सदरचे पेट स्कॅन बाहेरून तपासणी करून आणण्यासाठी गोरगरीब रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांचे कडे पैसेच नसल्याने रुग्ण व रुग्णाचें नातेवाईक चिंताक्रांत झालेले आहेत. ही बाब फक्त एखाद्याच रुग्णाची नसून बहूसंख्य रुग्णावर ही वेळ तथा आफात आलेली आहे.कॅन्सरचे शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे पेट स्कॅनची वाट पहावी लागणार असुन कर्करोग रुग्णालयात पेट स्कॅनची प्रतीक्षाच करावी लागत आहे. याला कारण म्हणजे सध्या शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर येथे या आधुनिक उपचार पद्धतीसाठी त्यासाठी आवश्यक असे न्युक्लिअर मेडिसिन तज्ज्ञ, तंत्रज्ञ, तपासणीसाठी लागणाऱ्या इतर सर्व सेवासुविधा उपलब्ध नाहीत ज्या की उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे असेही पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी नमूद केले होते.सदरचे पेट स्कॅनची पद्धत ही कॅन्सरची स्टेज ओळखण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण मदत करते जेणे करुन अनेक रूग्ण मरणाच्या दारातून बाहेर पडतात तसेच पेट स्कॅन द्वारे कॅन्सर कोणत्या स्टेजवर आहे याचे निदान करण्यास व आवश्यक ते उपचार करण्यास महत्वाची मदत होते व ते कळण्यास मदत होते आणि त्यामुळे आवश्यक तो पुढील उपचार झाल्या नंतरही कॅन्सर किती बरा झाला,उपचाराला कसा प्रतिसाद मिळत आहे, हे देखील या तपासणीतून कळते. कॅन्सर रुग्णांना किमान एक ते चार वेळा ही तपासणी करावी लागते असे नमुद करून त्यांनी आपल्या निवेदनात हेही नमुद केले की, या सर्व सेवा सुविधा सद्य स्थितीत उपलब्ध नसल्या मुळे रुग्ण जगण्याचा लढा देत आहेत.या महत्वाच्या अशा पेट स्कॅन साठी खासगी रुग्णालयात हजारो रुपये अदा करावे लागतात. शासकीय कर्करोग रुग्णालयात येणारे रुग्ण हे गोरगरीब असतात,शासकीय कर्करोग रुग्णालयाची सुसज्ज इमारत उपलब्ध असली तरी पेट स्कॅन ची सोय नसल्यामुळे रुग्णांच्या जिवितार्शी खेळ होत आहे.म्हणून पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी शासकीय कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजी नगर येथे पेट स्कॅन मशिन व तंत्रज्ञान येऊन ती सुरू होई पर्यंत किमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत या तपासणीचा अती तात्काळ समावेश करून गोरगरीब कॅन्सर रुग्णांना आधार देऊन त्यांचा जीव वाचवावा,कर्करोग रुग्णालयात उपचार घेण्यासाठी सदरची पेट स्कॅन प्रकिया ही अनिवार्य बाब आहे. साधारणतः २० हजार रुपयांच्या आसपास खासगी रुग्णालयात पेट स्कॅन तपासणी साठी मोजावे लागतात. गोर गरीब रुग्णांना ही रक्कमअजिबात परवडणारी नसल्यामुळे आणि पेट स्कॅन किमान ४ ते ५ वेळेस करणे आवश्यक असते म्हणून पेट स्कॅनची प्रतीक्षाच करावी लागत आहे.पेट स्कॅन कार्यान्वित करण्या साठी व इतर सेवा सुविधा साठी किमान ५० कोटीं निधीची आवश्यकता आहे. रुग्णांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी तात्काळ कार्यवाही होण्याचे आदेश आरोग्य व अर्थ विभागास व्हावेत अशी जोरकस मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्मंत्र्यांकडे केली असता त्यांनी वरील प्रमाणे आदेश दिले आहेत.

## शेतीच्या वादांवर कायमस्वरूपी तोडगा : सलोखा योजनेला दोन वर्षे मुदतवाढ



**मुंबई :** महाराष्ट्रातील हजारो शेतकरी कुटुंबातील शेतीच्या वादांवर तोडगा काढणाऱ्या सलोखा योजनेला २०२७ पर्यंत दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. शेतजमिनीचा ताबा, वहिवाटी, परंपरागत तंटे आणि कुटुंबांमध्ये वैर निर्माण करणाऱ्या शेतीच्या शेकडो वादग्रस्त प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी सलोखा योजना वरदान ठरल्याने राज्यातील शेकडो शेतकऱ्यांनी मुदतवाढ द्यावी अशी मागणी महसूलमंत्र्यांकडे केली होती.

विशेष म्हणजे, शेतीचे वाद मिटवण्यासाठी एरवी, मुद्रांक आणि नोंदणीसाठी येणारा मोठा खर्च या योजनेत केवळ दोन हजार रुपये इतका नाममात्र येतो. या योजनेअंतर्गत आतापर्यंत अनेक कुटुंबांमध्ये अतिशय जटिल ठरलेल्या एक हजार सात प्रकरणातील शेतीच्या आपसी वादांसह शेतजमिनीच्या अदलाबदलीच्या प्रकरणांचा समाधानकारक तोडगा निघाला आहे. महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या या वादविवादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सुमारे ८ कोटी ९९ लाख रुपयांची मुद्रांक सवलत दिली आहे.

महाराष्ट्रासह संपूर्ण देशामध्ये शेतजमिनीच्या मालकी हक्कावरून, हिस्स्याकरून, मोजणीवरून, चुकीच्या नोंदणीवरून व अशा अनेक कारणांमुळे अनेक प्रकरणांमध्ये वर्षानुवर्षे वाद सुरू आहे. हे वाद अनेकदा कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्यासाठी कारणीभूत ठरतात. या सगळ्याचा विचार करून डिसेंबर २०२३ मध्ये महायुती सरकारच्या महसूल विभागाने सामाजिक सौहार्द व सलोखा टिकून रहावा यासाठी 'सलोखा' योजनेची सुरुवात केली होती.

सलोखा योजनेंतर्गत एका शेतकऱ्याच्या नावावरील जमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील जमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र ₹१००० व नोंदणी फी नाममात्र ₹१००० आकारून मुद्रांक शुल्क व नोंदणी फी मध्ये मोठ्या प्रमाणात सवलत दिली जाते. यामुळे अशा प्रकारच्या वादांमधील जमीन हस्तांतरण प्रकिया सुलभ व नाममात्र खर्चात होते. सदर योजनेचा कालावधी दोन वर्षांच्याच असल्याने जानेवारी २०२५ मध्ये तो कालावधी संपुष्टात आला.

परंतु, या योजनेचा लाभ व लाभार्थ्यांचे प्रमाण पाहता राज्यातील शेतकरी बांधवांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध कायम राहावेत व सामाजिक सलोखा, सौदार्ह टिकून राहावे यासाठी 'सलोखा' योजनेचा कालावधी आणखी दोन वर्षांनी वाढवण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्याच्या महसूल विभागामार्फत आम्ही घेतला आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. मला विश्वास आहे, या योजनेच्या माध्यमातून अशा प्रकारची अनेक प्रकरणे सामंजस्याने मिटवल्या जातील. माझी सर्व शेतकरी बांधवांना विनंती आहे, की ज्यांची अशा प्रकारची वादाची प्रकरणे अजून चालू आहेत, त्यांनी त्वरित या योजनेचा लाभ घेऊन आपली प्रकरणे निकालात काढावीत, असे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.

## पंढरपुरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या महिलेला २१ लाखांची लॉटरी

**पंढरपुर :** पंढरपुरात एका स्वच्छता कर्मचारी महिलेला पांडुरंगच पावला आहे. या महिलेला 21 लाखांची लॉटरी लागली आहे. पांडुरंगच पावला, अशी भावना मनीषा वाघेला या महिलेने व्यक्त केली आहे. मनीषा वाघेला यांचे पंढरपूर येथील मेहतर गल्लीत 10X10 चे पत्र्याचे छोटे घर आहे. स्वच्छतेचे काम करून कुटुंबाचे उदरनिर्वाह चालते. अशा या गरीब महिलेला 21 लाखांची लॉटरी लागली असल्याने या महिलेचा व कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

मनीषा वाघेला या मेहतर समाजाचे असून मेहतर समाज पंढरपूरमध्ये गेल्या अनेक दशकांपासून वास्तव्यास आहे. या समाजाकडे स्वच्छतेचे काम दिले जाते. मनीषा वाघेला या पंढरपूर येथील चौफाळा येथील गणेश मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. यावेळी तिथेच एक लॉटरीचे दुकान होते. मनीषा यांनी सहज एक लॉटरीचे तिकीट काढावे म्हणून एक तिकीट खरेदी केले होते. नंतर त्या हे तिकीट देखहील विसरून गेल्या होत्या.

काही दिवसांनी त्यांनी सहज वृत्तपत्रात लॉटरीच्या तिकिटाचा नंबर चेक केला आणि त्यांना आनंदाचा धक्काच बसला. काहीच ध्यानीमनी नसताना मनीषा यांना तब्बल 21 लाख रुपयांचे बक्षीस लागल्याचे त्यांना कळले. 21 लाख रुपये जिंकल्यावर या पैशांचे काय करणार, असे विचारले असता त्या म्हणाल्या की, चांगले घर घेणार आणि आपल्या मुलांना हे काम करावे लागू नये म्हणून त्यांना चांगले शिक्षण देणार.

मेहतर समाज हा स्वच्छतेचे काम करतो. पंढरपूर येथे गेल्या अनेक पिढ्यांपासून मेहतर समाज वास्तव्यास आहे. अत्यंत गरिबीत हा समाज आपल्या कुटुंबाचे पालन करतो. स्वच्छतेच्या कामातून मिळकत देखील कमीच असते, त्यामुळे घरात आठरा विश्व दारिद्र्य. अशा परिस्थितीत एखादे मोठे बक्षीस लागले तर नक्कीच आनंद होणार व दारिद्र्यातून बाहेर पडण्याची व चांगले आयुष्य सुरू करण्याची संधी मिळते. तसेच आता मेहतर समाजातील मनीषा वाघेला यांना 21 लाखांचे बक्षीस मिळाले असून त्यांनी देखील चांगले घर घेण्याचा तसेच आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ एप्रिल २०२५

# प्रज्ञा साहित्य संघ महाराष्ट्र द्वारा आयोजित ४ थे एकदिवसीय भव्य कवी संमेलन

**अध्यक्षीय भाषण :** राज्यस्तरीय आंबेडकरी कवी संमेलनाचे संयोजक, उद्घाटक विमलताई वाघमारे, स्वागताध्यक्ष सौ. कल्पना कैलास राऊत, मावळते अध्यक्ष कविवर्य प्रशांत वंजारे, प्रज्ञा साहित्य संघाचे आयु. शालीक वानखेडे, मा. ग. ना. कांबळे व या ऊर्जावान महोत्सवात सहभागी होणारे तमाम प्रज्ञावंत कवी-कवयित्री ज्यांना मी बुद्धीवर विश्वास ठेवणारे जगातले क्रांतीकारी शास्त्रज्ञ मानतो ते तथागत महात्मा गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, सूर्यकुलातल्या तमाम प्रज्ञावंत, कवी, कवयित्री, समीक्षक, विचारवंत घडवणारे महाप्रज्ञावंत, युगनायक बाबासाहेब यांच्यासह तमाम महापुरुषांना मी अभिवादन करतो. मित्रांनो, वाशीमच्या भूमीने अनेक ऊर्जावान कवी, लेखक, पत्रकार, काव्याग्रह धरणारे संपादक, कथाकार घडवले आहेत. या सत्वशील भूमीला मी अभिवादन करतो. प्रज्ञा साहित्य संघाने उद्घाटन सत्रात अध्यक्षपद देऊन मला सन्मानित केले. त्यांच्या सर्व सदस्यांचे मी सादर आभार मानतो. माझ्या तेजस्वी, ओजस्वी मित्रांनो, कॉम्प्यूटर, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या काळात साहित्याने वैज्ञानिक दृष्टिकोन जपत समाजाला अंधारातून प्रकाशाकडे जाणारा राजमार्ग दाखवला पाहिजे! तो कलावादी, चंगळवादी लेखक दाखवणार नाहीत. आपल्या साहित्याने तर कलावादी साहित्याचा पोकळपणा सिद्ध केला. हे काम आम्ही सूर्यकुलातील लेखकांनाच करावे लागणार आहे! आचारक्रांतीचे जनक प्रबोधनकार ठाकरे म्हणाले होते- “धर्मावाचुनि प्राण न जाईदेवाविन नच, अडते,आत्मशक्ती खंबीर तयांच्यात्रिभुवन पाया पडते!”लोकहितवादींनी शास्त्र-पुराण बाजूला सारुन बुद्धी चालवायचा महामंत्र दिला. कविता तर जडतेला तोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते. कविता मनाची मशागत करते. मन शुद्ध करते. कविता कसं जगावं, वागावं हेही शिकवते. कविता केवळ मिरवायची वस्तू नसून ती मनात मुरवायची, जिरवायची बाब असते. बाबासाहेबांच्या तेजस्वी विचाराचं सत्त्व पचवलेली आंबेडकरी कविता माणसाला नीतिवान, गतिवान, ऊर्जावान आणि प्रज्ञावान बनवते. ती दंभ ढोंगाला चिरडून टाकते. तुच्छतावाद्यांना सुरुंग लावते. विकृतीवर प्रहार करते. मांगल्याची, समतेची आराधना करते. “झुंजार लेखणीला हरणे कबूल नाही,झुंजार लेखणीला झुरणे कबुल नाही!”..... सुर्यकुल (पृ.७०)असा क्रांतिकारी संदेश जागवत ही कविता अभिव्यक्त होते. “कविता-दर्पणाचा पाराखळाळती धाराचैतन्याचा वारा असते!कविता-ममतेचा पंखगर्जनेचा शंखबंडाचा डंख असते!!”.... ठिणगी (पृ.३) हा तिचा जाहीरनामा, वचननामा, हुकुमनामा असतो. परिवर्तनवादी कवी- “हो अक्षरेच आतासारे इमान माझेही अक्षरेच आतासारे प्रमाण माझे! ”असे ब्रीद बाळगून कविता लिहीत असतो. मित्रांनो, एपिक्यूरस नावाच्या विदेशी विचारवंतांने परमेश्वर, परलोक, स्वर्ग या गुंत्यात अडकून वेळ घालवू नये असे ठणकाऊन सांगितले. रोमन भाषेची नोबेल विजेती लेखिका हर्टा म्यूलर म्हणते- “जीवन विद्रोहाने भरलेली यात्रा आहे. जो ताणतणांवावर मात करून नेहमी संघर्ष करतो तो धाडसी, मुत्सद्दी माणूस असतो. संस्कारक्षम साहित्य जीवनाला तेज-चमक प्रदान करते.” थोर निरक्षर विज्ञानवादी संत गाडगे बाबांनी परमेश्वराच्या नावावर खपणाऱ्या अवडंबराला आरोपाच्या कस्टडीत बंदिस्त केले. जे त्यांना कळले ते आपल्याला का कळत नाही? चिंतक मित्रांनो, मी यापूर्वीही फुले, आंबेडकरी साहित्य संमेलनात आणि अस्मितादर्श साहित्य संमेलनात या भूमीत सन्मानित झालोय. त्यामुळे कविवर्य मोहन शिरसाट, शेषराव धांडे, दीपक ढोले, बाबाराव मुसळे, महेन्द्र ताजणे इ. अनेकांशी जुळलेलं वैचारिक अक्षय नातं अभंग आहे. या नात्यात प्रा. मधुकर बनसोड, कवयित्री मधुराणी बनसोड, असे अनेक प्रतिभावंत आहेत. मोहन शिरसाट यांनी तर सांस्कृतिक जिल्ह्याचा इतिहास लिहिला. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. श्रीपाल सबनीस, प्रा. केशव मेश्राम, डॉ. योगेन्द्र मेश्राम, बाबुरावजी बागूल, दया पवार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. सदा कऱ्हाडे, डॉ. भालचन्द्र फडके, डॉ. शैलेन्द्र लेंडे, नामदेव ढसाळ, कृष्णा किरवले, राजा ढाले, प्रा. डॉ. कुमुद पावडे, अरुण कांबळे, प्रा. अविनाश डोळस, डॉ. युवराज सोनटक्के, डॉ. महेन्द्र भवरे, ज.वि. पवार इ. अनेकांनी आपले योगदान देऊन आंबेडकरी साहित्याला शिखरावर नेऊन नवे परिमाण दिले ! नियतीवाद्यांचे, निराशावाद्यांचे, विकृतीवाद्यांचे साहित्य साहित्य नसते, मनुष्य हाच साहित्याचा आद्य, मध्य व अंतिम बिंदू असतो. लेखक कवीला काळाच्या कपाळावर आपल्या अक्षर क्रांतीची भक्कम मुद्रा कोरता आली पाहिजे. वाशीम जिल्ह्याचे पूर्वीचे नाव वसगुल्म होते. वाशीम शहर राजा वाकाटक राज्याची राजधानी होती. धोंडूजा, इंगोले, अनिल कांबळे, डॉ. सुनिल अवचार, ग.ना. कांबळे, शालीक वानखेडे असे असंख्य कवी या जिल्ह्यात लिहिते आहेत. ‘पहाट वारा’, ‘समता शाही’, ‘भीम किल्ला’, ‘सम्राट टाईम्स’, दैनिक ‘भारत’, ‘भारत संग्राम’ ही सामान्य जनतेशी एकरुप झालेली वर्तमान पत्रे हीच जनतेची मुखपत्रे असतात. दोस्तहो, संतोष वानखेडे नावाच्या या कलंदर, जिंदादिल माणसाने हा शब्दोत्सव आयोजित करण्यास पुढाकार घेतला. रिक्षा चालवून अक्षरांची आराधना करणाऱ्या या कलदार कार्यकर्त्यास मी अभिवादन करतो. दोस्तांनो, परिवर्तनाची लढाई खूप कठीण असते. “क्रांतीचं चक्र आम्हीच आमच्यासह फिरवू!” या बाबासाहेबांच्या शब्दांत खोल अर्थ दडलाय. आम्ही म्हणजे पीडित- दुर्लक्षित, तिरस्कृत, कोट्यावधी गरीब, दुबळे, श्रमिक, कष्टकरी. यासाठी गुलछबू लेखक अडथळे आणतील. यासाठी आपल्यालाच नवरचनेच्या अवकाशात गरुडझेप घ्यावी लागेल. भ्रांतीचं विसर्जन करून क्रांतीच्या पथाने जावं लागेल. विसाव्या शतकात पुरातनवादी-जीर्ण-टाकाऊ विचार खिळखिळे झाले. “इष्ट असेल ते बोलणारच!” हा बाणा अंगात भिनवावा लागेल. समविचारी साहित्य प्रवाहातल्या मित्रांना सोबत घ्यावं लागेल. समता, न्याय, ज्ञाननिष्ठा ही मूल्ये पेरण्यासाठी लेखण्या सज्ज कराव्या लागतील. मित्रांनो, आपले ऊर्जावान हात एकमेकांच्या हातांत असू द्या. तुम्ही शत्रू नाहीत, समतेच्या जगातले मानवतेचे शिलेदार आहात हे दिसू द्या. आपल्या या प्रज्ञापथाला कडकडून विरोध करणाऱ्या संकुचित-संकीर्ण, मुंगीच्या मनाच्या धेंडांना त्यांच्या डबक्यात स्वस्थ बसू द्या! मित्रांनो, मी माणसाचं मूल्य जपणारा छोटा पण सच्चा माणूस आहे. मी आपल्याकडूनच भरपूर ऊर्जा ग्रहण केली आहे. आपल्या या मौलीक संपर्कातले मोतीमोलाचे क्षण मी कधीच विसरणार नाही. एक कविता आपल्या दरबारात ठेऊन मी वाणीला विराम देणार आहे. साहित्यातच हे राष्ट्र जिवंत ठेवायची शक्ती आहे. साहित्यामुळेच नवा बलाढ्य भारत घडणार आहे! सत्याचा प्रकाश प्रक्षेपित करणारी ऊर्जावान लेखणीच अनाचार, दुराचार, व्यभिचार, कामाचार यांचा नि:पात करीत डॉ. कलाम यांच्या स्वप्नातला बलाढ्य भारत घडवणार आहे!! सत्वशील विचारांच्या गर्भातून नवी समतामय पहाट उगवणार आहे !! कविता अशी आहे....कविताकविता काळजातून कागदावर येतांना कवी असतो मुक्यांचा ओठ अन्याय उद्धवस्त करणारा वादळी विस्फोट ! कवितायातनांची मोळी असते करुणेची झोळी असते. अन्याय भेदणारी गोळी असते! कविता कवीचे युद्धात लढायचे शस्त्र असते. अन्यायाच्या नि:पाताचे अस्त्र असते चारित्र्याचे निर्मळ वस्त्र असते! कविता निनादणारा गर्जनेचा शंख असते. उब देणारा मायेचा पंख असतेकौर्य चिरडणारा विद्रोहाचा डंख असते!कविता : असते मानवतेची मधाळ बोली कविता : असते संयमाची लोभस डोली आणि कविता : असते विकृतीला खाक करणारी होळी ! कविता अंधांची आधार देणारी काठी असते अपंगांना साथ देणारी लाठी असतेसमुद्र एकवटणारी सृजनाची वाटी असते!ज्यांचं जागत कुणीच नसतं त्यांच्यासाठीकविता असते...म्हणून वर्तमान, भूतकाळ व्यापणारी कविताभविष्यातही अवश्य दिसते!खरं म्हणजे कविता कवीचा महाग्रंथ असतोम्हणूनच कवी विद्रोही असला तरी तो मानवतेचा करुणाघन संत असतो ! या महोत्सवात सहभागी होणारे सर्व प्रतिभावंत माझे गणगोत आहेत. ही संख्या गुणित पटीने वाढेल. या सर्वांचे मी अभिनंदन करतो. मित्रहो, माझं संबोधन आपण ऐकूण घेतलं. आपल्याशी सुसंवाद साधण्याची जी संधी उपलब्ध करून दिली. जय क्रांती ! जय भीम !! जय भारत!!!-

**डी.बी. जगत्पुरिया**
**९८६०४८५३९८**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002